त्रिपुराला 'माणिक' नको, 'हिरा' हवा!

डाव्या सरकारवर मोदींची तोफ

सोनामुरा । दि. ८ वृत्तसंस्था

ईशान्येकडील राज्ये जिंकण्याचा निर्धार करून त्या मोहिमेवर निघालेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज त्रिपुरातील सोनामुरा येथे झालेल्या सभेत मुख्यमंत्री माणिक सरकार यांच्यावर हल्ला चढवला. राज्यातील जनतेने बऱ्याच वर्षांपासून गळयात चुकीचे 'माणिक' घातले आहे. त्यामुळे विकासाच्या बाबतीत त्रिपुरा राज्य पिछाडीवर राहिले आहे. राज्याला आता 'माणिक' नको तर हिऱ्याची खरी गरज आहे, अशी कोटी करीत मोदी यांनी येथील सरकारवर तोफ डागली.

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मोदी यांनी सोनामुरा येथे प्रचार सभा घेतली. डावे हे लाठ्याकाठ्यांनी लोकशाही कारभार हाकत आहेत. त्यांच्याविरोधात बोलणाऱ्यांमध्ये त्यांनी दहशत निर्माण केली आहे. रोझ व्हॅली चिटफंड घोटाळ्यात त्यांनी गरिबांना लुटले आहे. गरिबांची लूट होऊ नये म्हणून त्यांना शिक्षा करायला हवी. २५ वर्षांपासून सत्तेत असलेल्या डाव्यांचे सरकार उलथवून लावा, असे आवाहनही त्यांनीकेले.

राज्यातील जनतेला आता घाबरण्याची गरज नाही. आता फक्त 'माणिक' उतरवून 'हिरा' घालावा लागणार आहे, असे मोदी म्हणाले. यावेळी त्यांनी इंग्रजी 'हिरा' या शब्दाचा अर्थ श्रोत्यांना समजावून सांगितला. एच म्हणजे 'हायवे', आयचा अर्थ 'आय वे', आरचा अर्थ 'रेल्वे' आणि ए म्हणजे 'एअर वे' अशी फोड त्यांनी केली.

केंद्र सरकारला ईशान्येकडील राज्यांचा विकास करायचा आहे. त्यासाठी रस्ते बांधून येथे विकास पोहोचवायचा आहे. अटलबिहारी वाजपेयी यांनी ईशान्येकडील राज्यांच्या विकासासाठी रस्ते बांधण्यास प्राधान्य दिले. त्रिपुराचे भाग्य बदलले तर देशाचे भाग्य बदलेल, असे मोदी म्हणाले.

आम्ही त्रिपुरात तीन 'टी'बर जोर देत आहोत. ट्रेड, टुरिझम आणि प्रशिक्षण याद्वारे युवकांना आपले कौशल्य दाखवण्याची संधी मिळेल. १९९६ नंतर त्रिपुरातील वेतनात बदल करण्यात आलेले नाहीत हे ऐकून मला आश्चर्याचा धक्का बसला, असेही मोदींनी सांगितले.

तेलगू देसमची संसदेत घोषणाबाजी

आंध्र प्रदेशला विशेष दर्जा देण्याची मागणी

नवी दिल्ली । दि. ८ सुरेखा टाकसाळ

आंध्र प्रदेशला विशेष दर्जा आणि न्याय देण्याची मागणी करीत एनडीए सरकारमधील घटक पक्ष असलेल्या तेलगू देसम पक्षाने आज लागोपाठ तिसऱ्या दिवशी संसदेच्या दोन्ही सभागृहांत सतत घोषणाबाजी केली. तसेच सभागृहाच्या कामकाजात अडथळे आणले.

तेलगू देसमच्या या पवित्र्यामुळे शिवसेनेपाठोपाठ हा पक्ष देखील भाजपापासून दुरावत चालल्याचे दिसत आहे. आगामी निवडणूक तो स्वतंत्रपणे लढण्याची ही नांदी मानली जात आहे. तेलगू देसमबरोबरच वायएसआर काँग्रेस पक्षाचे सदस्यही आंध्र प्रदेशला विशेष दर्जा आणि राज्यातील काही प्रकल्पांना अधिक वित्तीय सहाय्य मिळण्याची मागणी करीत होते. तसेच मागण्यांचे फलक उंचावून घोषणा देत होते.

यंदाच्या अर्थसंकल्पात आंध्र प्रदेशसाठी भरीव आर्थिक मदतीची तरतूद नसल्याबद्दल हे दोन्ही पक्ष नाराज आहेत. लोकसभेत अर्थसंकल्पावरील चर्चेला उत्तर देताना आंध्र प्रदेशातील सर्व प्रकल्प व संस्थांना येत्या काही दिवसांतच अतिरिक्त निधी दिला जाईल, असे आश्वासन अर्थमंत्री अरुण जेटली यांनी दिले. परंतु त्यामुळे या पक्षांचे समाधान झाले नाही.

त्या आधी आज सकाळी राज्यसभेतही तेलगू देसम व वायएसआय काँग्रेसच्या सदस्यांनी आंध्र प्रदेशला न्याय देण्याची मागणी सातत्याने लावून धरली. माहिती तंत्रज्ञान राज्यमंत्री चौधरी यांनी सभागृहातील तिढ्यातून मार्ग काढण्यासाठी काही सूचना केली असता अन्य विरोधी पक्षांनी त्यास आक्षेप घेतला. तोच प्रकार लोकसभेतही झाला. सौगत रॉय (तृणमूल काँग्रेस) यांनी नियमाचा मुद्दा उपस्थित करीत राज्यमंत्री चौधरी यांना अशी सूचना करण्यास त्यांनी हरकत घेतली.

काल राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील चर्चेला लोकसभेत पंतप्रधान उत्तर देत असतानाही तेलगू देसम पक्ष व वायआरएस काँग्रेसच्या सदस्यांनी संपूर्ण वेळ सभापतींच्या समोर वेलमध्ये उभे राहून नारेबाजी करीत भाषणामध्ये व्यत्यय आणण्याचा प्रयत्न केला होता. संसदेत व संसदेबाहेर भाजपपासून दूर होण्याचे ठरवले असले तरी सत्तेमधून मात्र सध्या बाहेर पडायचे नाही, असे तेलगू देसम पक्षाने धोरण अवलंबले आहे.

राज्यसभेत गोंधळ

नवी दिल्ली । दि. ८ वृत्तसंस्था

काँग्रेसच्या नेत्या रेणुका चौधरी यांना राज्यसभेत हसताना पाहून रामायण मालिकेनंतर बऱ्याच काळाने आज असे हास्य पाहण्याचे व ऐकण्याचे भाग्य मिळाले आहे, अशी टिप्पणी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना महागात पडली आहे. हा स्त्रियांचा अनादर असल्याचे सांगून काँग्रेसने राज्यसभेत जोरदार गोंधळ घातला. या वक्तव्यावर पंतप्रधानांनी माफी मागावी, अशी मागणी काँग्रेसने केली आहे. काँग्रेससह विरोधकांनी केलेल्या गोंधळामुळे राज्यसभेचे कामकाज तासाभरासाठी तहकूब करण्यात आले.

राज्यसभेत आज अर्थसंकल्पावर चर्चा होणार होती. मात्र त्यापूर्वीच रेणुका चौधरी यांच्या मुद्द्यावरून काँग्रेसने राज्यसभेत गोंधळ घातला. पंतप्रधानांचे वक्तव्य आक्षेपार्ह असून त्यांनी त्याबाबत माफी मागावी, अशी मागणी विरोधकांनी लावून धरली.

मोदी यांनी केलेल्या वक्तव्यावर चौधरी यांनी सभागृहात काहीच भाष्य केले नाही. मात्र सभागृहाबाहेर येताच त्यांनी मोदींच्या वक्तव्याचा निषेध नोंदवला. पंतप्रधानांनी वैयक्तिक टीका केली आहे. त्यांच्याकडून वेगळी अपेक्षा काय करणार? कोणत्याही महिलांच्या विरोधात असे वक्तव्य करणे गैर आहे, असे त्या म्हणाल्या.

बुधवारी राज्यसभेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील आभार प्रस्तावावर मोदी भाषण करीत होते. त्यावेळी चौधरी जोरात हसत होत्या. त्यामुळे मोदींच्या भाषणात व्यत्यय येत होता. राज्यसभा सभापती व्यंकय्या नायडू यांनी चौधरी यांना समजावण्याचा प्रयत्न केला. तरीही त्या हसत राहिल्या. तेव्हा मोदींनी चौधरींना हसू देण्याची विनंती सभापतींकडे केली. रामायण मालिकेनंतर बऱ्याच काळाने असे हास्य ऐकण्याचे आणि पाहण्याचे भाग्य मिळाल्याचा टोला मोदींनी लगावताच सभागृहात हास्यकल्लोळ झाला होता.

राहुल गांधी माझेही बॉस: सोनिया

नवी दिल्ली । दि. ८ वृत्तसंस्था

काँग्रेस अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल राहुल गांधी यांना पक्षाच्या माजी अध्यक्षा सोनिया गांधी यांनी शुभेच्छा दिल्या. पक्षाला नवे अध्यक्ष लाभले आहेत. सर्वांच्या वतीने मी राहुल यांना शुभेच्छा देते. ते आता माझेही 'बॉस' झाले आहेत, असे सोनिया म्हणाल्या.

काँग्रेस कार्यकारणीच्या बैठकीत सोनिया गांधी बोलत होत्या. पक्षावर निष्ठा असलेले सर्वच जण त्याच निष्ठेने राहुल गांधी यांच्यासोबत काम करतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. दोन महिन्यांपूर्वीच राहुल गांधी यांची काँग्रेस अध्यक्षपदी निवड करण्यात आली. दिल्लीतील काँग्रेस मुख्यालय परिसरात झालेल्या एका सोहळ्यात सोनिया यांनी राहुल यांच्याकडे पक्षाच्या अध्यक्षपदाची सूत्रे सोपवली होती. राहुल यांच्या येण्याने काँग्रेस पक्षाला नवसंजीवनी मिळाल्याचे मत अनेक काँग्रेस कार्यकर्त्यांनी यावेळी व्यक्त केले. 'राहुल गांधी आता माझेही बॉस आहेत, यात तिळमात्र शंका नाही. पक्षाला नवीन अध्यक्ष मिळाले आहेत. सर्वांच्या वतीने मी राहुल यांना शुभेच्छा देत आहे. तुम्ही ज्या निष्ठेनं, प्रमाणिकपणानं आणि ज्या उर्जेनं माझ्यासोबत काम केलं तिच निष्ठा तुम्ही राहुलसोबत काम करताना दाखवाल अशी मला खात्री आहे' असा विश्वास सोनिया गांधींनी यावेळी व्यक्त केला. गुजरात विधानसभा निवडणूक आणि राजस्थानमध्ये झालेल्या पोटनिवडणुकीत पक्षानं चांगली कामगिरी केली आहे. आगामी कर्नाटक विधानसभा निवडणुकीतही काँग्रेसला चांगले यश मिळेल. २०१४ च्या निवडणुकीत पक्षाला मोठा धक्का बसला आहे. पण येणाऱ्या निवडणुकांमध्ये तयारीला लागा, असे आवाहन त्यांनी केले.

चौधरी, अय्यर काँग्रेसला भार : पूनावाला

नवी दिल्ली । काँग्रेस नेत्या रेणुका चौधरी राज्यसभेत जोराने हसल्यानंतर त्यांच्याबद्दल टिप्पणी करणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी माफी मागावी, या मागणीसाठी पक्षाचे सदस्य आक्रमक झाले आहेत. त्याचवेळी काँग्रेसचेच समर्थक तेहसीन पूनावाला यांनी मात्र चौधरींवर तोफ डागली आहे. चौधरी आणि मणिशंकर अय्यर हे दोघेही काँग्रेसला भार आहेत, असे ट्विट पूनावाला यांनी केले आहे.

रेणुका चौधरी आणि मणिशंकर अय्यर हे दोघे काँग्रेसला भार आहेत हे मी काँग्रेसचा कट्टर समर्थक असल्याने प्रामाणिकपणे मान्य करतो. त्यांच्या अहंकारामुळे काँग्रेसचे नुकसान होत आहे. हा गांधी आणि नेहरुंचा पक्ष आहे. वरिष्ठ सभागृहातील त्यांच्या हसण्याने मीही आश्चर्यचकित झालो, असे पूनावाला यांनी म्हटले आहे.

विशेष म्हणजे, राहुल गांधींची काँग्रेस अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर त्याविरोधात आवाज उठवणारे शहजाद पूनावाला हे तेहसीन पूनावाला यांचे धाकटे बंधू आहेत. त्यावेळीही तेहसीन यांनी शहजादची भूमिका चुकीची असून त्यांच्याशी नाते तोडून टाकण्याची घोषणाही केली होती.

MAHAVITARAN

E-TENDER NOTICE

Digital Sealed & signed offers are invited in Two Bid system Through E tender method from eligible registered firms for the works of DPDC OTSP / SCP in Nashik R, Urban I and II, Chandwad Division tender no, SE/NUC/T-49,50,67,71,72,73. For details such as nature of work, Estimated cost EMD, Tender fee etc bidders are requested to refer Employers website http://works.mahadiscom.in/eTender/etender. The tender is available from 9.2.2018 to 20.2.2018 in electronic format can upload on website in latest by 21.2.2018 up to 23.00 Hrs. contact no. 7875766020

PRO No. 173 **Superintending Engineer, MSEDCL, NUC**

जाहीर नोटीस

तमाम लोकांना कळविण्यात येते की

मिळकतीचे वर्णन– मौजे दातली ता. सिन्नर, जि. नाशिक येथिल **गट नं.** ३२६ वरील मिळकतीबाबत जनरल मुखत्यार म्हणुन नेमणुक केली होती.

माझ्या अडचणी व जबाबदारी कमी झाल्यामुळे मला मी तुम्हाला दिलेले **जनरल मुखत्यारपत्र** रद्द करीत आहे मी आजपासुन जनरल मुखत्यार पत्र नमुद केलेल्या पुर्ण कामे मी स्वत: करणार आहे त्यामुळे तुम्हाला **दिलेले पुर्ण अधिकार संपुष्टात आणत आहोत.** यानंतर वरील मिळकतीच्या संदर्भात कोणत्याही प्रकारचे व्यवहार अगर माझ्या वतीने सही कर नये. या नोटीसीने आपल्यास कळविण्यात येते की, **दिनांक ०८/०२/२०१८** नंतर पासुन कोणत्याही प्रकारचे तुम्ही सदर दस्ताच्या आधारे व्यवहार केल्यास ते बंधनकारक राहणार नाही व सदर दस्त **रद्द** समजावा. यानंतर व्यवहार केल्यास ते आमच्यावर बंधनकारक राहणार नाही. याची कायदेशिर जबाबदारी तुमच्यावर राहील. या बाबत संपुर्ण जनतेला समजावे म्हणुन दैनिक देशदुत वृत्तपत्रात जनरल मुखत्यारपत्र रद्द केल्याची नोटीस प्रसिध्द करीत आहे.

हि जाहीर नोटीस. सिन्नर, दि. ०८/०२/२०१८

आमचेमार्फत प्रसिध्द

श्री. गोपाल चिंधू बर्के, ॲडव्होकेट

सिन्नर न्यायालय, सिन्नर

टायटल व्हेरिफिकेशनसाठी जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन– कसबे सिन्नर. ता. सिन्नर, जि. नाशिक येथील सिन्नर नगरपालिका हद्दीतील मिळकत **सर्व्हे नं. ८५६/२** मधील **प्लॉट नं. ९** यांसी क्षेत्र २९७.५० चौ.मी., आकार २१४ रु. ०० पैसे. यांसी चतु:सिमा मंजुर ले–आऊट प्रमाणे..

येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत ही **श्री. सागर रणछोड गुजराथी** यांचे मालकीची असून निर्बंध व बिनबोजाची असुन कोणत्याही जड जोखमेत गुंतविलेली नाही, असे सांगून त्यांनी आमचे अशील यांचेबरोबर विक्रीचा व्यवहार निश्चित करुन विसारापोटी रक्कम स्विकारलेली आहे. सबब, सदर मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा करार, साठेखत, खरेदीखत, विसारपावती, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, गहाण, दान, लिन, लिज, कोर्ट जप्ती, अन्नवस्त्र, दावा, दरखास्त, अर्ज वगैरे स्वरुपाचा हक्क अथवा हितसंबंध असल्यास **७ (सात)** दिवसाचे आत आमचे खालील पत्त्यावर लेखी कागदपत्रानिशी व लेखी पुराव्यानिशी समक्ष येवून हरकत नोंदवावी व खात्री पटवून द्यावी अन्यथा सदर मिळकत ही निर्बंध व बिनबोजाची आहे असे समजून आमचे अशीलास निर्बंधपणाचा दाखला दिला जाईल. परस्पर वर्तमानपत्रात प्रसिध्द केलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी. ही टायटल व्हेरीफिकेशनसाठी जाहीर नोटीस,

सिन्नर, दिनांक- ०८/०२/२०१८

आमचे मार्फत प्रसिध्द

श्री. देवेंद्र विश्वनाथ खरात, ॲडव्होकेट

प्लॉट नं. ७, स्वेतपुर्ती, भैरवनाथ हौ.सोसा. सिन्नर, ता. सिन्नर, जि. नाशिक. मोबा. ९८२२४०३४८८

जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन– मौजे एकलहरे, ता. सिन्नर, जि. नाशिक येथील **गट नं.** ७६ यांसी क्षेत्र ५ हे. ५५ आर. + पो.ख. २ हे. २७ आर. आकार रु. ३–६६ पैसे. या पैकी **मधुकर लक्ष्मण घोडेकर** यांचे मालकीहक्काचे व स्वतंत्र कब्जा उपभोगाचे **० हे. ८० आर. क्षेत्र आकार रु. ०–५३ पैसे.** यांसी चतु:सिमा गावचे नकाशाप्रमाणे व रेव्हेन्यु रेकॉर्ड प्रमाणे. येणे प्रमाणे वर्णनातील मिळकत. सदरची मिळकत ही निर्बंध बिनबोजाची आहे असे विश्वासाने सांगुन त्यांनी आमचे पक्षकाराबरोबर विक्रीचा व्यवहार ठरवुन आमचे पक्षकाराकडून विसाराची रक्कम स्विकारलेली आहे. सदरच्या मिळकतीचे टायटल निर्बंधपणाची खात्री करण्यासाठी सदरची नोटीस प्रसिध्द करीत आहोत. सबब, वरील मिळकतीवर कोणत्याही प्रकारचा गहाण, दान, लिन, लिज, अन्नवस्त्र, तारण पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, जमिन जप्ती, कुळ वारस अदलाबदल करार वगैरे बोजा, कोर्ट कारवाई चालु असल्यास नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसांच्या आत नमुद केलेल्या खालील पत्त्यावर कागदपत्राच्या पुराव्यानिशी लेखी हरकती नोंदवाव्यात. मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत निर्बंध आहे असे समजुन व्यवहार पुर्ण केला जाईल व निर्बंधपणाचा दाखला आमचे पक्षकारास दिला जाईल. मुदतीनंतर व लेखी पुरावा नसलेली हरकत अथवा परस्पर वर्तमानपत्रात जाहीर हरकत प्रसिध्द केल्यास त्या आमचे पक्षकारावर व मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. कळावे, ही जाहीर नोटीस. सिन्नर, दि. ०८/०२/२०१८

आमचे मार्फत प्रसिध्द

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, **मिळकतीचे वर्णन–** तुकडी व जिल्हा, जिल्हा परिषद नाशिक, पोट तुकडी ता. पंचायत समिती सिन्नर पैकी **मौजे मुसळगांव** गावचे ग्रा.प.चे हद्दीतील व **मौजे मुसळगांव** गावचे शिवारातील मिळकत **स.नं. ९०५/२ व मधील प्लॉट नं. १४३ यांसी क्षेत्र १५१.०० चौ.मी., यांसी** आकार १५ रु. १० पैसे.

वर वर्णन केलेली मिळकत ही **गोविंद खंडू माळी व इतर** यांचे नावावर आहे. सदर मिळकत आमचे कब्जा वहिवाटीत आहे. सदरची मिळकत ही विक्री केलेली असुन विसाराची रक्कम स्विकारली आहे. सदरहू मिळकती बाबत कोणाचीही हरकत नसल्याने ही टायटल व्हेरीफिकेशनसाठी नोटीस प्रसिध्द करीत आहोत.

सबब, सदर मिळकतीवर कुठल्याही प्रकारचा हक्क वा अधिकार लिन, लिज, गहाण, दान, बक्षिसपत्र, साठेखत, अन्नवस्त्र, विसारपावती, मृत्युपत्र, जनरल मुखत्यारपत्र वा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क व अधिकार असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ७ दिवसांचे आंत मुळ कागदपत्रानिशी लेखी हरकत खालील पत्त्यावर द्यावी व आमची खात्री पटवावी. सदरचे मुदतीत हरकत न आल्यास सदरची मिळकत ही निर्बंध, बिनबोजाची व तबदिल करणे योग्य आहे असे समजुन तसा निर्बंधपणाबाबतचा दाखला देण्यात येईल. मुदतीनंतर व कागदपत्रांशिवाय आलेल्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही. तसेच परस्पर वर्तमानपत्रांत घेतलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाही व त्या वरील जमीन मालकांवर बंधनकारक राहणार नाहीत.

कळावे, ही जाहीर नोटीस असे. सिन्नर, ०८/०२/२०१८

आमचे मार्फत प्रसिध्द

श्री. शिवराज मुरलीधर नवले, ॲडव्होकेट

बोरात कॉम्प्लेक्स, विजय नगर, सिन्नर, जि. नाशिक मो. ९५५२२२४८०१

साहित्य पुरवठा मागणी/ निविदा/ टेंडर नोटीस

याद्वारे घोटी बु.।। ग्रामपालिकेला सन २०१७–२०१८ मध्ये आयोजित केलेल्या शेतकी, औद्योगिक, संकरीत व डांगी जावरांच्या प्रदर्शनाकरिता लागणारे साहित्य/वस्तू/सेवा यासाठीच्या सिलबंद निविदा मागविण्यात येत आहेत. इच्छुकांनी आपल्या निविदा दि. १६.०२.२०१८ पर्यंत ग्रामपालिका कार्यालयात पोहोचतील अशा पाठवाव्यात.

अ.क्र.	तपशील साहित्य/वस्तू /कामाचे नाव	नग वर्णन
१)	छपाई	
	अ. मोठे पोस्टर, फोर कलर १८ x २७	१०००
	ब. निमंत्रण पत्रिका, फोर कलर	१०००
	क. लिफाफा, फोर कलर	१०००
	ड. प्रशस्ती पत्रक, फोर कलर	३०० ते ५००
	इ. हॅण्डबिल, सिंगल कलर १२ x १६	२०००
२)	लाईट व्यवस्था	
	अ. हॅलोजन	२५
	ब. ट्युब लाईट	१००
	क. लाऊडस्पीकर संपूर्ण सेट	१
	ड. प्रदर्शन आवारात विद्युत रोषणाई	
३)	मंडप	
	अ. श्रोत्यांसाठी ५० x १०० फुटाचा मंडप	१
	ब. कुस्त्यांसाठी १५ x ३० मंडप व स्टेज	१
	क. स्टॉल १० x १० चे	५० स्टॉल
	ड. स्टेज २५ x १६	१
	इ. गेट कमान	१
४)	फुल जेवण (राईस प्लेट)	८०० ते १००० ताट
५)	१ फुटी लाकडी खुंट्या	आवश्यकतेनुसार
६)	ओला व सुका चारा	आवश्यकतेनुसार
७)	समारंभाचे फोटो	

निविदा मंजूर/ नामंजूर करणेचे अधिकार राखून ठेवणेत आलेले आहेत. नामंजुरीबाबत पत्रव्यवहार केला जाणार नाही.

अटी व शर्ती :-

१. ग्रा.पा. कार्यालयात सुट्टीचे दिवस सोडून कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल.

२. अ.नं. १ ते ७ करिता स्वतंत्र निविदा सिलबंद लिफाफ्यात मुदतीत सादर कराव्यात.

निविदा फी १००/– रु. निविदा दाखल करण्याचा दिनांक ०९.०२.२०१८ ते १६.०२.२०१८. निविदा उघडण्याचा संभाव्य दिनांक : १७.०२.२०१८ वेळ

निविदा सुचना

शाळेची भिंत (कंपाऊंड वॉल) बांधण्यासाठी निविदा मागविण्यात येत आहे. निविदेची माहिती, अटी व शर्तीसाठी खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

युनिव्हर्सल ॲकेडमी इंग्लिश मिडियम स्कुल

गुलाबनगर, मखमलाबाद नाका, पंचवटी, नाशिक-४२२००३. फोन. २५१६०६०

HCKK VENTURES LIMITED

(Formerly known as Shreenath Industrial Investment Company Limited)
CIN: L45100MH1983PLC263361
Regd. Office : 3 Orchid, Savarkar Nagar, Opposite Gangapur Road Police Station,
Nashik- 422013, Maharashtra. **Tel**: +91 253 6578612
Email: info@hckkventures.com; **Website**: www.hckkventures.com

EXTRACT OF UNAUDITED STANDALONE FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER AND NINE MONTHS ENDED DECEMBER 31, 2017 (₹ In Lakhs)

Sr. No.	Particulars	Quarter ended 31.12.2017	Nine Months ended 31.12.2017	Quarter ended 31.12.2016
		Unaudited	Unaudited	Unaudited
1.	Total Income from Operations	0.037	1.739	-
2.	Net Profit / (Loss) for the period (before Tax, Exceptional and/or Extraordinary items)	(2.915)	(8.051)	(3.205)
3.	Net Profit / (Loss) for the period before tax (after Exceptional and/or Extraordinary items)	(2.915)	(8.051)	(3.205)
4.	Net Profit / (Loss) for the period after tax (after Exceptional and/or Extraordinary items)	(2.915)	(8.051)	(3.205)
5.	Total Comprehensive Income for the period [Comprising Profit / (Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)]	(2.915)	(8.051)	(3.205)
6.	Equity Share Capital	371.00	371.00	340.00
7.	Reserves (excluding Revaluation Reserve) as shown in the Audited Balance Sheet of the previous year	99.17		
8.	Earnings Per Share (of Rs.10/- each) (for continuing and discontinued operations) - 1.Basic (Rs.): 2. Diluted (Rs.):	(0.079)	(0.217)	(0.094)

Note: The above is an extract of the detailed format of Quarter ended Financial Results filed with the Stock Exchange under Regulation 33 of the SEBI (Listing Obligation and Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Quarterly Financial Results are available on the website of the Stock Exchange i.e. www.bseindia.com and the website of the Company i.e. www.hckkventures.com.

For HCKK VENTURES LIMITED
Sd/-
Harish Kanchan
Chairman and Managing Director
DIN: 00615999

Date: February 09, 2018
Place: Mumbai

TAPARIA

TAPARIA TOOLS LTD.

Regd. Office : 52 & 52B, MIDCea, Satpur Nashik – 422 700
E-Mail : nashik@tapariatools.com Web site : http://www.tapariats.com CIN L99999MH1965PLC013392
Extract of Statement of Un-audited Finanacial Results for the Quarter and Nine Montsed 31st Dec. 2017

(Rs. in lakhs)

Sr. No.	Particulars	Quarter ended			Nine Months ended	
		31/12/2017	30/09/2017	31/12/2016	31/12/2017	31/12/2016
		Un-audited	Un-audited	Un-audited	Un-audited	Un-audited
1	Total Income from operationsnclusive of Excise Duty)	10866.83	10136.55	9062.11	29,814.60	28,370.00
2	Net Profit for the period (befe Tax , Exceptional and/or Extraordinary Items)	638.08	482.71	567.48	1,531.36	1,421.34
3	Net Profit for the peridefore Tax (after Exceptionaland/or Extraordinary Items)	638.08	482.71	567.48	1,531.36	1,421.34
4	Net Profit for the period aftex (after Exceptional and/or Extraordinary Items)	420.93	323.47	373.44	1,012.82	933.55
5	Total Comprehensive Income fo the period [Comprising Profit for the period (after tax) and Other Comprehensive Inconter(tax)]	425.84	328.38	362.81	1027.55	901.66
6	Paid up Equity Share Capital (Facelue Rs.10/- per share)	303.58	303.58	303.58	303.58	303.58
7	Reserves (excluding Revaluation Reserve) ascwn in the Audited Balance Sheet of the previous year	-	-			-
8	Earnings Per Share (Face value of Rs.10/- each) (for continuing and discontinued operations) - Basic & Diluted :	13.87	10.66	12.30	33.36	30.75

Notes The Company has adopted IndiaAccounting Standards IndAS fromApril 01, 2017Accordingly financial results for the quartenda nine month ended December 31, 2017, have been prepared following theASndecogniton and measurement pricciples. Financial results fdhe quarter and nine months ended Decemb31, 2016 have been restated based on the ASprinciples.

2 Reconciliation of the net profit for the quarter and nine months ended December31,2016 as repded under pevious GAAP andnow under Ind ASis as follows:

(Rs.in Lakhs)

Particulars	Quarter Ended on 31-Dec-16	Nine Months ended on 31-Dec-16
Net Profit as per previous GAAP	362.81	901.66
Add: Actuarial loss on employee defineenefit plan recognised in OCI	16.26	48.78
Less: Change in current tax in the Dec. 2016 quarter andmonths ended on acont of the abov	(5.63)	(16.89)
Net Profit as per Ind AS (before OCI)	373.44	933.55
Less: Actuarial loss on employee defined benefit plan recognised in OCI	(16.26)	(48.78)
Add: Change in current tax theDec. 2016 quarter and ninemonths endedaccount of the above	5.63	16.89
Net Profit as per Ind AS	362.81	901.66

3 The above is an extract of the detailformat of the Un-auded Financial Resuls for the quarter and nine monthended on December 31, 2017 filed with the Stock Exchange under Regula33 of the SEBI Listing Obligtions and Disclosure Reqirements) Regulations, 2015. The full format of the Un-audi Financial Results fo the quarte and ninemonths ended on December 31 2017 are available on the Stock Exchange website (wwwbseindia.com) and Company's website wwwtapariatools.com

By order of the Board

For. TAPARIA TOOLS LIMITED